दिन विशेष...

१४८३ : बाबर यांचा याच दिवशी जन्म झाला.
१८१५ : वाफेवर चालणारे जहाज व पाणबुडी संशोधक रॉबर्ट फुलटोन यांचे निधन झाले.
१९३६ : क्षयरोग निवारणदिन. – लक्ष्मीबाई टिळक स्मृतिदिन.
१९९८ : मराठी चित्रपट अभिनेत्री ललिता पवार यांचे निधन.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८३,२९४.६६ +४७९.९५ (०.५८%)
डॉलर ₹ ९०.९१

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | २० |
| दिल्ली | २९ | १५ |
| मुंबई | ३४ | २२ |
| नागपूर | ३३ | १९ |
| पुणे | ३४ | १५ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक १०५ किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

आपल्या आत्म्याची आवाज ऐका; तो नेहमी खरे मार्ग दाखवतो.

सूर्योदय – सूर्यास्त
स.-६:५२ संध्या-६:३०

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६२,३६०/- ३,००,०००/-

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### भारताच्या पराभवाचा पाकिस्तानमध्ये उत्सव!

**इस्लामाबाद ।** टी-२० विश्वचषक २०२६ च्या सुपर-८ फेरीत दक्षिण आफ्रिकेने भारताचा ७६ धावांनी पराभव केला. यानंतर पाकिस्तानमध्ये मोठ्या उत्साहात आनंद साजरा करण्यात आला. पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज मोहम्मद आमिरने एका टीव्ही शोमध्ये भारतीय संघाच्या पराभवाची ज्या प्रकारे खिल्ली उडवली, त्यामुळे सोशल मीडियावर भारतीय चाहत्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

### ५० प्रवाशांना घेऊन जाणारी बस उलटली

**लखनऊ ।** उत्तर प्रदेशातील पूर्वांचल एक्सप्रेसवेवर सोमवारी एक भीषण अपघात झाला. पानीपतहून बिहारच्या अररियाकडे जाणारी स्लीपर कोच बस अनियंत्रित होऊन उलटली. या दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू झाला असून ४० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना लखनऊच्या केजीएमयू ट्रॉमा सेंटरमध्ये हलवण्यात आले आहे. अपघात गोसाईगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीत अलियारपूर परिसरात घडला. बसमध्ये सुमारे ४० ते ५० प्रवासी होते. काही प्रवाशी झोपलेले असताना हा अपघात झाला.

# देशाचे पहिले दहशतवाद विरोधी धोरण जाहीर

## दहशतवादाबाबत शून्य सहिष्णुता हा मुख्य उद्देश

वृत्तसंस्था । दिल्ली



**देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेला असलेल्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी केंद्र सरकारने सोमवारी प्रहार या नावाखाली भारताचे पहिले अधिकृत दहशतवादविरोधी धोरण जाहीर केले. झिरो टॉलरन्स म्हणजेच दहशतवादाबाबत शून्य सहिष्णुता हे या धोरणाचे मुख्य सूत्र असून, गुप्तचर यंत्रणांवर आधारित प्रतिबंधात्मक कारवाई आणि दहशतवाद्यांच्या आर्थिक रसद पुरवठ्यावर पूर्णपणे टाच आणणे, हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे.**

गृह मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या या ऐतिहासिक दस्तऐवजात दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी सात प्रमुख स्तंभांवर आधारित बहुस्तरीय रणनीती मांडण्यात आली आहे. या धोरणामध्ये दहशतवाद रोखणे, तात्काळ प्रतिसाद देणे, अंतर्गत क्षमतांचे एकत्रीकरण, मानवी हक्क आणि कायद्याचे राज्य, दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या परिस्थितीचे निर्मूलन, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्नांची सांगड घालणे आणि संपूर्ण समाजाच्या सहभागातून पुनर्वसन व लवचिकता निर्माण करणे या बाबींवर भर दिला आहे.

शेजारील देशांमधील अस्थिरतेचा फायदा घेऊन काही देश दहशतवादाचा वापर सरकारी धोरणाचे साधन म्हणून करत असल्याचा उल्लेख करत, भारताने कोणत्याही विशिष्ट धर्माशी किंवा वांशिकतेशी दहशतवादाचा संबंध जोडण्यास स्पष्ट नकार दिला आहे. धोरणानुसार, केवळ लष्करी किंवा तांत्रिक कारवाईवर अवलंबून न राहता गरिबी आणि बेरोजगारी यांसारख्या सामाजिक समस्यांवरही लक्ष केंद्रित केले जाईल, जेणेकरून कट्टरतावादाला आळा बसेल. याशिवाय, सायबर दहशतवाद आणि अण्वस्त्र किंवा रासायनिक हल्ल्यांच्या धोक्यांपासून संरक्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञानात गुंतवणूक (पान २ वर)

# अमेरिका-इराण युद्ध भडकणार?

## इराण सोडण्याचं सरकारचं भारतीयांना आवाहन

वृत्तसंस्था । नवी दिल्ली



**अमेरिका आणि इराण या दोन देशांमधील तणाव कमालीचा वाढला आहे. यादरम्यान अमेरिका आगामी काळात इराणवर हल्ला करण्याची शक्यता आहे. यादरम्यान भारत सरकारने इराणमधील भारतीय नागरिकांना देश सोडण्याचे आवाहन केले आहे.**

भारतीय दूतावासाने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये आपल्या नागरिकांना व्यावसायिक विमाने यासारख्या उपलब्ध असलेल्या वाहतुकीच्या साधनांचा वापर करून इराण सोडण्याचे आवाहन केले आहे. या मार्गदर्शक सूचना इराणमध्ये असलेले विद्यार्थी, धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी गेलेले नागरिक, व्यावसायिक आणि पर्यटक अशा सर्व भारतीय नागरिकांना देण्यात आली आहे.

१४ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा पुनरुच्चार करण्यात येत आहे की, सर्व भारतीय नागरिक आणि भारतीय वंशाच्या नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी, निदर्शने किंवा आंदोलने केले जात असलेल्या भागांमध्ये जाणे टाळावे, इराणमधील भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहावे आणि सर्व घडामोडी जाणून घेण्यासाठी स्थानिक प्रसारमाध्यमांवर (पान २ वर)

# मुस्लिम आरक्षणाबाबत उच्च न्यायालयात ९ मार्चला सुनावणी



वृत्तसंस्था । मुंबई

सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात मुस्लिमांना दिलेले पाच टक्के आरक्षण रद्द करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर उच्च न्यायालय ९ मार्च रोजी सुनावणी घेणार आहे.

न्यायमूर्ती रियाज छागला आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठापुढे याचिकाकर्ते आणि वकील एजाझ नक्वी यांनी सोमवारी ही याचिका सादर केली. तसेच, याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली. मुस्लिमांना सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात दिलेले पाच टक्के आरक्षण उच्च न्यायालयाने २०१४ मध्ये कायम ठेवले होते. या निकालाला कुणाकडूनही सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलेलं नाही. परंतु, उच्च न्यायालयाच्या या निकालाचे पालन करण्याऐवजी राज्य सरकारने आरक्षण रद्द करण्याचा मनमानी निर्णय घेतला, (पान २ वर)

# नेपाळमध्ये बस नदीत कोसळून १८ जणांचा मृत्यू

## • चालकाचे नियंत्रण सुटले; २५ जण गंभीर जखमी

वृत्तसंस्था । धाडिंग

**नेपाळमध्ये सोमवारी पहाटे भीषण बस अपघात झाला असल्याची माहिती समोर आली आहे. धाडिंग येथे झालेल्या भीषण अपघातात १८ जणांचा मृत्यू झाला तर २५ जण गंभीर जखमी झाले आहेत. प्रवासी बस नदीत पडल्याने हा अपघात झाला. या अपघातामुळे खळबळ उडाली आहे.**

अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि बचावकार्य सुरू आहे. समोर आलेल्या माहितीनुसार ही बस पोखराहून काठमांडूला जात होती. सोमवारी पहाटे धाडिंगमधील त्रिशुली नदीत कोसळली, ज्यामुळे किमान १८ जणांचा मृत्यू झाला. बेनीघाट रोरांग ग्रामीण नगरपालिकेच्या वॉर्ड ३ मधील चरौंडीजवळील चिंधरा येथे १:१५ वाजता बस नदीत कोसळली. धाडिंग जिल्हा वाहतूक पोलिस कार्यालयाचे प्रमुख शिशिर थापा यांच्या माहितीनुसार, मृतांची संख्या १८ वर पोहोचली आहे. दरम्यान, महामार्ग बचाव व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजकुमार ठाकूर यांनी सांगितले की, २५ जखमी प्रवाशांना



उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले आहे. बसमध्ये ३५ हून अधिक प्रवासी होते.

धाडिंग येथील जिल्हा वाहतूक पोलिस कार्यालयाचे प्रमुख शिशिर थापा यांनी सांगितले की, मृतांचा आकडा १८ वर पोहोचला आहे. (पान २ वर)



### ➤ अपघात कसा घडला

**स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, बस पोखराहून काठमांडूला जात असताना, वाटेत चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि ती त्रिशुली नदीत कोसळली. हा अपघात पहाटे १:१५ च्या सुमारास झाला. बस धाडिंग जिल्ह्यातील बेनीघाट रोरंक परिसरातून जात होती. अपघाताच्या कारणाबाबत अधिकृत माहिती अद्याप उपलब्ध नाही.**

# कुंडलीचे कारण देऊन लग्नास नकार देणे ठरू शकतो गुन्हा!

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

### दिल्ली उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध प्रस्थापित केल्यानंतर केवळ कुंडली जुळत नसल्याचे कारण देऊन लग्नास नकार देणे हा फौजदारी गुन्हा ठरू शकतो, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. अशा प्रकरणांमध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम ६९ अंतर्गत फसवणुकीद्वारे शरीरसंबंध ठेवल्याचा गुन्हा लागू होऊ शकतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांनी एका जामीन अर्जावर सुनावणी करताना हे निरीक्षण नोंदवले. संबंधित प्रकरणात एका व्यक्तीने एका महिलेशी गेल्या आठ वर्षांपासून संबंध ठेवले होते. लग्नाचे वारंवार आश्वासन देऊन त्याने तिच्याशी शारीरिक जवळीक साधली होती. मात्र, नंतर कुंडली जुळत नसल्याचे कारण पुढे करत त्याने लग्नास नकार दिला. यावर न्यायालयाने कठोर भूमिका घेत आरोपीचा जामीन अर्ज फेटाळून लावला. न्यायालयाने नमूद केले की, केवळ प्रेमसंबंध तुटले किंवा लग्न (पान २ वर)

# चोपडा पालिकेचा कोणतीही करवाढ नसलेला ३०२.३७ कोटींचा अर्थसंकल्प सादर

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा नगरपरिषदने सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी तब्बल ₹३०२.३७ कोटींचा लोकाभिमुख व विकासाभिमुख अर्थसंकल्प कोणतीही करवाढ न करता विशेष सभेत बहुमताने मंजूर केला. नवनियुक्त नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली सादर झालेला हा पहिलाच अर्थसंकल्प असून तो शहराच्या सर्वांगीण विकासाचा रोडमॅप ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.**




### • उत्पन्नाचे प्रमुख स्रोत

मालमत्ता कर ₹१७.११ कोटी, पाणीपट्टी ₹४.६५ कोटी, न.पा. मालमत्तेपासून भाडे व फी ₹११०.६९ कोटी तसेच विविध शासकीय योजनांतून मोठ्या प्रमाणात निधी अपेक्षित आहे. यात अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना, नगरोत्थान योजना, विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना, महा. सुवर्ण जयंती नगरोत्थान भुयारी गटार योजना, नदी संवर्धन योजना, अमृत योजना, १५ वा वित्त आयोग, स्वच्छ भारत मिशन, सौर ऊर्जा प्रकल्प आदींचा समावेश आहे.


### ➤ विकास कामांसाठी भरीव तरतूद

रस्ते विकास, भुयारी गटार योजना, विशिष्ट नागरी सेवा सुविधा, नदी संवर्धन, स्वच्छता, सौर ऊर्जा, अग्निशमन बळकटीकरण, नाना-नानी पार्क, नवीन पथदिवे उभारणी आदी कामांसाठी कोट्यवधींची तरतूद करण्यात आली आहे. नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील यांनी सांगितले की, आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा अर्थसंकल्प तयार करण्यात आला असून करवाढ न करता नियोजनबद्ध महसूल संकलनावर भर देण्यात आला आहे. मुख्याधिकारी रामनिवास झंवर व लेखाधिकारी मयुर गर्मा यांनी अर्थसंकल्पाचे सविस्तर सादरीकरण केले. हा अर्थसंकल्प चोपडा शहराच्या उज्ज्वल व शाश्वत विकासाचा संकल्प असल्याचे सभेत नमूद करण्यात आले.

# नाशिक मनपाचे २०० कोटींचे 'ग्रीन बॉंड्स' लॉंच!

वृत्तसंस्था । नाशिक

**सिंहस्थ कुंभमेळ्यात गोदावरीच्या स्वच्छतेसाठी क्लीन गोदावरी बॉण्डद्वारे निधी उभारल्यानंतर नाशिक महापालिकेने आता पाणी पुरवठा योजनेच्या विस्तारासाठी हरित महापालिका कर्जरोखे (ग्रीन म्युनिसिपल बॉण्ड्स) विक्रीची घोषणा केली आहे. या माध्यमातून २०० कोटी रुपये उभारले जाणार आहेत. हिंदु धर्मियांच्या जगातील सर्वात मोठ्या सोहळ्यात कर्ज रोख्यात गुंतवणूक करून सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे व मनपा आयुक्त मनिषा खत्री यांनी केले आहे.**




आगामी कुंभमेळयासाठी नाशिकमध्ये हजारो कोटींचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहे. त्यास शासनाकडून निधी दिला जात असला तरी आपल्या हिश्याची रक्कम देण्यासाठी महापालिकेने कर्जरोख्यांच्या माध्यमातून निधी उभारणीचा मार्ग स्वीकारला आहे. त्या अंतर्गत डिसेंबरमध्ये नाशिक महानगरपालिकेने 'क्लीन गोदावरी बॉण्ड'मधून २०० कोटी रुपये उभारले होते.

आता प्रत्येकी एक हजार रुपये दर्शनी मूल्य असलेल्या सूचीबद्ध, करपात्र, असुरक्षित, प्रतिदेय आणि आणि अपरिवर्तनीय हरीत महापालिका कर्जरोख्यांची विक्री केली जाणार आहे. हे कर्जरोखे प्रत्येकी १२५ रुपये अंकीत मूल्यांचे आठ स्वतंत्रपणे हस्तांतणीय व प्रतिदेय मुख्य भाग समाविष्ट आहेत. २५ फेब्रुवारी रोजी हे कर्जरोखे खरेदीसाठी खुले होऊन दोन मार्च २०२६ रोजी बंद होतील.

## २२ जि.प., पं.स.च्या निवडणुका लांबणीवरच

# ओबीसी आरक्षणाचा पेच कायम

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यात आता काही दिवसांपूर्वीच स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका पार पडल्या. त्यानंतर महापालिका अन् जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकाही होऊन गेल्या आहेत. परंतू राज्यातल्या ५० टक्के आरक्षण मर्यादेच्या पुढे गेलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी आता सुप्रीम कोर्टाने परवानगी नाकारली आहे. महाराष्ट्रामध्ये २२ जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित**



**आहेत. सुप्रीम कोर्टाचा हा निर्णय आता या २२ जिल्हापरिषद आणि पंचायत समित्यांना मोठी दणका मानला जात आहे.**

महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सुप्रीम कोर्टामध्ये ही सुनावणी पार पडली. या सुनावणीमध्ये (पान २ वर)

● राज्य सरकारच्यावतीनं तुषार मेहता यांनी अंतिम आदेशाच्या अधीन राहून निवडणूक घेण्यास परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, सुप्रीम कोर्टानं अशी परवानगी देता येणार नसल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलल्या गेल्याचे मानले जात आहे.

## संपादकीय

### एआयचा बोलबाला

देशाची राजधानी असलेल्या नवी दिल्लीमध्ये इंडिया एआय इम्पॅक्ट नावाच्या परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्यामुळे सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाचा बोलबाला सुरू झाला आहे. अर्थात, गेल्या काही वर्षांपासून हा विषय सातत्याने चर्चेत असला, तरी राजधानी दिल्लीमध्ये सुरू झालेल्या या परिषदेच्या निमित्ताने पुन्हा एकदा या विषयाला नव्या स्वरूपात चर्चेला चालना मिळाली आहे. या परिषदेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. विद्यार्थी, संशोधक, तंत्रज्ञ, गुंतवणूकदार या सर्वांनीच या इंडिया एआय इम्पॅक्ट परिषदेबाबत उत्सुकता दाखवली आहे. आगामी कालावधीमध्ये या क्षेत्रासाठी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक करण्याचे संकेतही अनेक संबंधितांनी दिले आहेत. एकीकडे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे बेरोजगारीत वाढ होण्याची भीती व्यक्त होत असतानाच या प्रकारच्या इम्पॅक्ट परिषदेचे आयोजन करून आगामी कालावधीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे तत्त्वज्ञान सकारात्मक पद्धतीने वापरण्याचे संकेत देण्यात आले असले, तरी अद्यापही या तंत्रज्ञानाबाबत संभ्रम आणि संशय कायम आहे हे विसरून चालणार नाही. एकीकडे राजधानीत हे प्रदर्शन भरले असतानाच दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयाने याबाबत जी एक टिप्पणी केली आहे तीसुद्धा महत्त्वाची आहे. सर्वोच्च न्यायालयात किंवा अन्य कोणत्याही न्यायालयात दाखल करण्यात येणाऱ्या याचिकांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर चिंताजनक असल्याचे स्पष्ट मत सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी व्यक्त केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा म्हणजेच एआयचा वापर करून दाखल करण्यात आलेल्या याचिकांमध्ये बनावट आदेशांचा संदर्भ आणि चुकीची उदाहरणे दिली जात असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले आहे. अशा प्रकारच्या चुकीच्या संदर्भांमुळे आणि चुकीच्या माहितीमुळे न्यायदानावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आणि भीतीही सरन्यायाधीशांनी व्यक्त केली आहे. अस्तित्वातच नसलेल्या एखाद्या केसचा उल्लेख करून एआयच्या माध्यमातून याचिका दाखल केल्या जात असल्याची माहितीही सरन्यायाधीश यांनी दिली आहे हे निश्चितच महत्त्वाचे आहे. म्हणजे एकीकडे राजधानीमध्ये एआयच्या इम्पॅक्टचा सकारात्मक वापर चर्चिला जात असताना दुसरीकडे न्यायदानाच्या प्रक्रियेत एआयचा वापर कशा चुकीच्या पद्धतीने केला जात आहे हे समोर येत आहे. शेवटी आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता एक तंत्रज्ञान आहे आणि तंत्रज्ञानाचा वापर कशाप्रकारे केला जातो यावरच त्याचे फलित अवलंबून असते. विज्ञान शाप की वरदानफ हा विषय नेहमीच चर्चेला येतो. त्याच धर्तीवर ङ्गआर्टिफिशियल इंटेलिजन्स शाप का वरदानफ याची चर्चा आतापासूनच सुरू केली जात आहे. जरी बेरोजगारी हा त्याचा त्वरित दिसून येणारा परिणाम असला, तरी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून ज्या प्रकारचे कंटेंट तयार केले जात आहे, त्याबाबत विश्वासार्हता कशी ठेवायची हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेल्या चिंतेमुळे अधोरेखित होत आहे हे विसरून चालणार नाही. शेवटी एखादे तंत्रज्ञान जरी निर्माण झाले तरी त्याचा वापर कशाप्रकारे केला जातो हेच जास्त महत्त्वाचे असते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून आता अस्तित्वात नसलेल्या गोष्टीच समोर आणल्या जात असल्याने गैरसमजाचे आणि संभ्रमाचे वातावरण पसरण्याची भीती लक्षात घ्यायला हवी. औद्योगिक किंवा आर्थिक विकास यासाठी या प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर जरी स्वीकारार्थ असला तरी हे तंत्रज्ञान जर चुकीच्या हातात पडले तर त्यातून अनेक नकारात्मक गोष्टी समोर येतील हेसुद्धा विसरता येणार नाही.

# स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी चिकित्सक वृत्ती जोपासावी

## ● मुख्याध्यापक आर. आर. धनगर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । भुसावळ

**पारंपरिक शिक्षण पद्धतीतून बाहेर पडून आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे काळाची गरज आहे. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी बालवयापासूनच चिकित्सक वृत्ती जोपासावी, असे प्रतिपादन सु.रा.आंबेडकर विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.आर.धनगर यांनी केले.**



भुसावळ येथील कलाम सायंटिस्ट सेंटर येथे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. दहावी-बारावीच्या गुणांपेक्षा आजकाल जेडबलई व नीटसारख्या स्पर्धा परीक्षांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या परीक्षांमध्ये प्राविण्य मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी घडणाऱ्या प्रत्येक घटनेकडे चिकित्सक दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे, असे केल्यास नवीन माहिती आत्मसात करता येते आणि ज्ञान अधिक भक्कम होते, असे त्यांनी सांगितले. बहादूरपूर (ता. पारोळा) येथील रा.का. मिश्रा विद्यामंदिर या शाळेतील विद्यार्थ्यांनी भुसावळ शहरातील कलाम सायंटिस्ट सेंटरला शैक्षणिक भेट दिली. या निमित्ताने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास ग.स.सोसायटीचे कर्ज समिती अध्यक्ष योगेश इंगळे, भुसावळ प्राथमिक सोसायटीचे चेअरमन प्रदीप सोनवणे, संचालक समाधान जाधव व विक्रांत चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी सेंटरची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यानंतर दिवसभर विज्ञान विषयातील विविध ॲक्टिव्हिटींची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

सुनील वानखेडे यांनी गणित व विज्ञान विषय सोपा असून, विविध ट्रिक्स आणि प्रयोगांच्या माध्यमातून तो सहज समजावून घेता येतो, याबाबत मार्गदर्शन केले. नदीम शेख यांनी चांद्रयान-३ मोहिम, शरीरातील अंतर्गत अवयव तसेच गणितातील त्रिमितीय भौमितिक आकृत्यांबाबत माहिती देत विद्यार्थ्यांकडून प्रतिकृती तयार करून घेतल्या.

### ➤ शैक्षणिक सहलीतून विद्यार्थ्यांनी मिळवली उपयुक्त माहिती

**या शैक्षणिक सहलीतून विद्यार्थ्यांनी गणित, विज्ञान आणि अवकाश विषयांतील विविध प्रतिकृती तयार करून त्यामागील वैज्ञानिक तत्त्वे समजून घेतली. रा.का मिश्रा विद्यामंदिरच्या शिक्षिका रेवती अमृतफळे, नंदा साळुंखे, धर्मेश चौधरी, राकेश बडगुजर तसेच डायमंड स्कूलचे शिक्षक वसीम खान यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एकूणच, या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, प्रयोगशीलता आणि आत्मविश्वास वृद्धिंगत झाला असून, भविष्यातील स्पर्धा परीक्षांसाठी प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे.**

## लग्नाला नकार दिल्याने तरुणीवर प्राणघातक हल्ला; संशयिताला अटक

प्रतिनिधी । पहूर

लग्नास नकार दिल्याच्या रागातून एका २० वर्षीय तरुणीचे अपहरण करून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना पहूर ते हिवरखेडा रोडवर घडली आहे. याप्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे. फिर्यादी २० वर्षी तरुणी रा. नेरी दिगर, ता. जामनेर) ही बी.कॉमच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. दि. २१ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० ते ११:३० वाजेदरम्यान, संशयित आरोपी श्रीकृष्ण देवचंद जाधव (रा.चारुतांडा, ता.सोयगाव) याने पीडितेशी बोलायचे असल्याचे सांगून तिला जबरदस्तीने मोटारसायकलवर बसवले. आरोपीने तिला पहूर ते हिवरखेडा रस्त्यावरील एका निर्जन केळीच्या शेतात नेले. तेथे त्याने, तू आताच माझ्यासोबत पळून चल, आपण लग्न करू, असा तगादा लावला. मात्र, पीडितेने लग्नास स्पष्ट नकार दिला. लग्नाला नकार दिल्याने आरोपीने पीडितेला शिवीगाळ केली. तू माझी नाही झालीस, तर कोणाचीच होऊ देणार नाही, असे म्हणत त्याने पीडितेचा गळा दाबून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी पहूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सपोनि प्रमोद कठोरे या प्रकरणाचा करत आहे.

## दानपेटी फोडणाऱ्या चोरटा जेरबंद; दोंडाईचा पोलिसांची कामगिरी

प्रतिनिधी । दोंडाईचा

**जुने कोळदे गावातील वर्णेश्वर महादेव मंदिरातील दानपेटी फोडून रोख रक्कम व सोन्याचे वस्तू लंपास करणाऱ्या चोरट्यास दोंडाईचा पोलिसांच्या शोध पथकाने अवघ्या २४ तासांत जेरबंद करीत बेड्या ठोकल्या. चोरट्याकडून एकूण २३ हजार ५० रुपये किंमतीची रोकड व सोन्याचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**



पोलीस ठाण्यात दि.२१ रोजी हरसिंग गुलाबसिंग गिरासे (५५) रा. जुने कोळदे ता. शिंदखेडा यांनी फिर्याद दिली होती. दि.२० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ ते दि.२१ रोजी पहाटे ५ वाजेचेदरम्यान जुने कोळदे येथील वर्णेश्वर महादेव मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील रोख रक्कम व सोन्याचे वस्तू अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक दिनेश सोनवणे यांनी मंदिरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. फुटेजमधील संशयित व्यक्तीचा शोध घेण्यासाठी आजूबाजूच्या परिसरात तपासचक्रे वेगाने फिरविण्यात आली. गुन्ह्यातील चोरीस गेलेला माल व संशयिताचा शोध घेण्यासाठी शोध पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना सुचना दिली. त्यानुसार, केलेल्या शोध पथकाने तपासादरम्यान दि.२१ रोजी सायंकाळी साहर शिवारात नानाभाऊ प्रतापसिंग गिरासे यांच्या ऊसाच्या शेतात ऊसतोडीचे काम सुरू असताना तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेजमध्ये संशयित व्यक्ती आढळून आला. त्याची चौकशी केली असता त्यास बोलता येत नसल्याचे पथकाला समजले. त्यानंतर त्याचा चुलत भाऊ राजेश ठुनक्या पवार (४५) चौकशी करण्यात आली. तेंव्हा संशयिताने आपले नाव मुक्या कांतीलाल पवार (४०) रा. अजनाळे ता.धुळे असल्याचे सांगून गुन्ह्याची कबुली दिली. तसेच त्याने चोरी केलेला मुद्देमाल ऊसतोडीच्या शेतातील झोपडीमधील पालमधून काढून दिला.

## स्नेहसंमेलनात चिमुकल्यांच्या नृत्याचे आकर्षण

प्रतिनिधी । सोनगीर

**येथील जुपिटर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा पार पडला. चिमुकल्यांनी नृत्य कलांचे सादरीकरण केले.**

विद्यार्थ्यांनी विविध धार्मिक तसेच शास्त्रीय, लोकनृत्य किंवा बॉलिवूड गाण्यांवर सादरीकरण केले. त्यामुळे चिमुकल्यांनी केलेल्या कला सादरीकरणाने मान्यवरांचे मने जिंकून घेतली. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात चिमुकल्यांचे कौतूक केले.

ज्युपिटर इंग्लिश मेडियम स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या सोहळ्यादरम्यान विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विशेषतः धार्मिक ऐतिहासिक व देशभक्ती या विषयावर नाटिका सादर केले. कृष्णलीला, अहिल्याबाई होळकर, नरसिंह अवतार, मनिकरनिका, द्रौपदी वस्त्रहरण, छावा, पेरेंट्स थीम आर्मी थीम या सर्व नाट्यांना प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. याकार्यक्रमाचे उद्घाटन सोनगीर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संदीप ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. काझी जुबेर अख्तर हे होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे संस्थापक विनायक पाचपुते, अध्यक्ष रमणीक जैन, सचिव नंदकिशोर चौधरी, संस्थेचे अभिजीत पाचपुते, डॉ. कल्पेश देशमुख, डॉ. शशिकांत आपटे, उद्योजक लखन रुपनर, उमेश पाचपुते, योगिता देशमुख, सुनंदा कासार, श्रीकांत देशपांडे, व्यवस्थापक शेखर देशमुख, रमेश कासार, पराग देशमुख आदी उपस्थित होते. आभार दीपिका बडगुजर यांनी मानले.

## पान १ वरून

**अमेरिका-इराण......**

लक्ष ठेवावे, असे या मार्गदर्शक सूचनांमध्ये सांगण्यात आले आहे. तसेच इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांना पासपोर्ट आणि ओळखपत्र यासह प्रवास आणि इमिग्रेशनसंबंधी त्यांची सर्व कागदपत्रे त्यांच्याबरोबर तयार ठेवण्याचा सल्ला देखील देण्यात आला आहे. तसेच कोणत्याही मदतीसाठी भारतीय दूतावासाशी संपर्क साधाव, असे आवाहन देखील करण्यात आले आहे. अमेरिका इराणवर हल्ला करणार? गेल्या महिन्यात इराणमध्ये झालेले आंदोलन सरकारने हिंसकपणे चिरडून टाकल्यानंतर अमेरिका इराणमध्ये सैन्य हस्तक्षेपाच्या धमक्या देत आहे. गेल्या महिन्यापासून अमरेकेने मध्य पूर्वेत मोठ्या प्रमाणात सैन्य तैनात केले आहे.

**मुस्लिम आरक्षणाचे काय......**

असे नक्की यांनी न्यायालयाला सांगितले. तसेच, शासननिर्णय रद्द करण्यात यावा, अशी मागणी केली. याचिकाकर्त्यांचे म्हणणे थोडक्यात ऐकल्यानंतर न्यायालयाने याचिकेवर ९ मार्च रोजी सुनावणी ठेवली. नक्की यांनी याचिकेत, राज्याच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने १७ फेब्रुवारी रोजी मुस्मिम आरक्षण रद्द करण्याबाबत काढलेल्या शासननिर्णयाला आव्हान दिले आहे. तसेच, सरकारचा हा निर्णय संविधानाचे उलंघन करणारा आणि मुस्लिम समुदायाच्या हिताच्या विरोधात असल्याचा दावाही याचिकेत केला आहे. सरकार अल्पसंख्याक समुदायाच्या सदस्यांशी म्हणजेच मुस्लिम समुदायाशी वांशिक भेदभाव करत आहे. हे संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे. आरक्षण रद्द करण्याच्या सरकारच्या निर्णयामागे कोणतेही तर्कसंगत कारण नसल्याचा दावा देखील याचिकेत करण्यात आला आहे.

**नेपाळमध्ये बस नदीत......**

महामार्ग बचाव व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजकुमार ठाकूर यांनीही या घटनेवर भाष्य केले. त्यांनी सांगितले की, २५ जखमी प्रवाशांना उपचारासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. बसमध्ये ३५ हून अधिक प्रवासी होते. रात्रीच्या वेळी केलेले बचावकार्य खूपच कठीण होते. मात्र , नेपाळी सैन्य, सशस्त्र पोलिस दल, नेपाळ पोलिस आणि स्थानिक लोकांच्या मदतीने सर्वांना वाचवण्यात आले.

**देशाचे पहिले दहशतवाद......**

वाढवण्याची तरतूद यात आहे. दहशतवादाच्या तपासात सुरुवातीपासूनच कायदेशीर तज्ञांचा सहभाग सुनिश्चित करून गुन्हेगारांना कठोर शिक्षा मिळवून देण्यावरही या धोरणात भर देण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि द्विपक्षीय करारांच्या माध्यमातून परदेशात लपलेल्या दहशतवाद्यांचे प्रत्यार्पण आणि त्यांच्यावर निर्बंध आणण्यासाठी भारत आता अधिक आक्रमक पावले उचलणार आहे. सायबर सुरक्षा आणि तांत्रिक तपासावर भर - तंत्रज्ञानाच्या युगात दहशतवादी संघटना डार्क वेब, क्रिप्टो वॉलेट्स आणि एन्क्रिप्टेड मेसेजिंग ॲप्सचा वापर करून आपली ओळख लपवत आहेत. या अदृश्य आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रहार धोरणात सायबर सुरक्षा आणि तांत्रिक तपासावर विशेष भर देण्यात आला आहे.

**ओबीसी आरक्षणाचा......**

आता सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणुका घेण्यास परवानगी मिळावी यासाठी राज्य सरकारने मागणी केली होती. मात्र, सुप्रीम कोर्टाने आता उर्वरित सर्व जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई करणारा निर्णय दिला आहे. राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र व राज्य सरकार या याचिकेवर सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने बांठिया समितीपूर्व स्थितीनुसार निवडणुका घेण्याचे निर्देश दिले होते. मात्र राज्य निवडणूक आयोगाने आरक्षण निश्चित करताना ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर २२ जिल्हा परिषद आणि संबंधित पंचायत समित्यांमधील निवडणुकांना स्थगिती देण्यात आली होती.

**कुंडलीचे कारण देऊन......**

होऊ शकले नाही म्हणून फौजदारी कायदा लागू करता येत नाही, हे मान्य आहे. परंतु, या विशिष्ट प्रकरणात आरोपीने वारंवार लग्नाचे आश्वासन दिले होते. कुंडलीच्या मुद्द्यावरून घरच्यांचा असलेला विरोध त्याला आधीपासूनच माहीत असतानाही त्याने आश्वासन दिले आणि संबंध ठेवले. लग्नाच्या खोट्या आश्वासनावर आधारित हे शारीरिक संबंध असल्याने, प्रथमदर्शनी हे प्रकरण फसवणुकीद्वारे केलेल्या शरीरसंबंधांच्या कक्षेत येते. या प्रकरणातील पीडितेने यापूर्वी नोव्हेंबर २०२५ मध्ये तक्रार केली.

## पुरनाडमध्ये धाडसी घरफोडी अडीच लाखांचा माल लंपास

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

तालुक्यातील पुरनाड वस्ती येथे एका बंद घराचे कडी-कोयंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे दागिने आणि रोख रकमेसह सुमारे २ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना दि.२२ फेब्रुवारी रोजी घडली. या प्रकरणी मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी लक्ष्मण गोविंद दगडे (वय ४२, रा. पुरनाड वस्ती) हे आपल्या कुटुंबासह राहतात. २२ फेब्रुवारीच्या पहाटे १ ते १.३० वाजेच्या सुमारास अज्ञात दोन चोरट्यांनी त्यांच्या घराच्या मागील लाकडी दरवाजाला होल पाडून आतील कडी उघडली. चोरट्यांनी घरात प्रवेश करून लोखंडी पेटीत ठेवलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. एकूण २,४२,००० रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे.

## भोरगाव लेवा पाटीदार पंचायततर्फे नगरसेवकांचा सत्कार

### ● केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

प्रतिनिधी । जळगाव

भोरगाव लेवा पाटीदार पंचायत ठाया पाडळसे, जळगाव विभागामार्फत नवनिर्वाचित महापौर, नगराध्यक्ष व नगरसेवक यांचा सत्कार केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.




जळगाव येथे भोरगाव लेवा पाटीदार पंचायत ठाया पाडळसे, जळगाव विभागामार्फत आयोजित नवनिर्वाचित महापौर, नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार सोहळा कार्यक्रमाचे आयोजन केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे व भोरगाव लेवा पंचायत कुटुंबनायक ललित पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून नवनिर्वाचित महापौर, नगराध्यक्ष व नगरसेवकांचा भोरगाव लेवा पाटीदार पंचायत ठाया पाडळसे यांच्यावतीने सत्कार करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी आमदार राजुमामा भोळे, माजी खासदार डॉ. उल्हास पाटील, माजी आमदार शिरिष चौधरी, जळगाव महापौर दीपमाला काळे, प्रा.पी.आर.चौधरी, संजय राणे, विष्णू भंगाळे यांची उपस्थिती होती.

## लघु पशुवैद्यकीय सेवांसाठी स्वतंत्र राष्ट्रीय कौन्सिलची स्थापना करा

प्रतिनिधी । धुळे

**देशातील पशुपालकांना तळागाळात तात्काळ व परवडणारी पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणाऱ्या पदविकाधारक अलाईड व्हेटरनरी सर्व्हिसेस कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक व कायदेशीर दर्जावाढीचा प्रश्न आता संसदेच्या पातळीवर नेण्याची गरज असल्याचे मत पशु चिकित्सा व्यवसायी संघटनेच्या शिष्टमंडळाने व्यक्त केले.**



यासंदर्भात खा. शोभा बच्छाव यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. ग्रामीण भारतात प्राथमिक व लघु पशुवैद्यकीय सेवा मोठ्या प्रमाणावर पदविकाधारकांकडूनच खा. शोभा बच्छाव यांना निवेदन दिले. त्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमातील असमानता, राष्ट्रीय स्तरावरील एकसंघ धोरणाचा अभाव आणि कायदेशीर अधिकारांतील मर्यादा याकडे शिष्टमंडळाने लक्ष वेधले. देशभर इयत्ता बारावी (विज्ञान) नंतर तीन वर्षांचा एकसमान व दर्जेदार पशु चिकित्सा शास्त्र पदविका अभ्यासक्रम तातडीने लागू करावा., नॅशनल पॅराव्हेट कमिशनच्या माध्यमातून स्वतंत्र मायनर व्हेटरनरी सर्व्हिसेस कौन्सिल स्थापन करून या क्षेत्राचे प्रभावी नियमन करावे आदीसह निवेदनात स्पष्ट केल्या आहेत. खा. बच्छाव यांनी निवेदनातील सर्व मुद्यांची गांभीर्याने दखल घेत संबंधित मंत्रालयाशी चर्चा करून आवश्यक विधेयक लोकसभेत मांडण्यासाठी तसेच या विषयावर सविस्तर संसदीय चर्चा घडवून आणण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. या शिष्टमंडळाचे नेतृत्व महासंघाचे राष्ट्रीय सचिव डॉ.संजय पाटील यांनी केले. यामध्ये डॉ.नरहर पाटील, डॉ.रमेश उकांडे, डॉ. मुकेश माळी, डॉ. सोहनलाल राठोड, डॉ. राजेंद्र चिंचोले, डॉ. ओ. झेड. कोळी, डॉ. विशाल वाकडे यांनी केले.

## घरफोडीला आळा घालण्यासाठी रात्रीची गस्त कडक : धिवरे

प्रतिनिधी । धुळे

जिल्ह्यातील घरफोडीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी रात्रीची गस्त अधिक प्रभावी करण्यात आली आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या निर्देशानुसार ग्रामसुरक्षा दल, नाईट राउंड कर्मचारी आणि स्थानिक संरक्षण पथकांचा समन्वय वाढवून घरफोडी प्रवण परिसरांत विशेष तपासण्या सुरू आहेत. एमआयडीसी परिसरात सखोल चेकिंग, टोल नाक्यांवर अचानक वाहन तपासणी आणि रात्री संशयास्पद वाहनांच्या हालचालींवर लक्ष ठेवत नाकाबंदी करण्यात येत आहे. गस्तीचे वेळापत्रक व ठिकाणे अनपेक्षित ठेवून ठराविक पॅटर्न टाळण्यावर भर देण्यात आला आहे. सर्व अधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यांना भेट देऊन लॉकअप तपासणी करावी. तसेच घरफोडी प्रतिबंधावर विशेष लक्ष केंद्रित करावे, असे निर्देश पोलीस अधीक्षक धिवरे यांनी दिले आहेत. नाईट राउंड कर्मचाऱ्यांना एकत्र बोलावून समन्वयात्मक सूचना देण्यात आल्या आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# महापौरांचा शिस्तीचा बडगा!

## महापौरांनी घेतली अधिकारी-कर्मचाऱ्यांची हजेरी; लेटलतीफ कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

प्रतिनिधी । जळगाव

**महानगरपालिकेच्या कामकाजात शिस्त आणण्यासाठी आणि नागरिकांच्या तक्रारींचा वेळोवेळी निपटरा करण्यासाठी महापौर दीपमाला काळे यांनी सकाळी १० वाजेनंतर आलेल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना शिस्तीचा पाठ देवून कडक शब्दांत तंबी दिली आहे. महापौरांनी सोमवारी दिलेल्या सर्प्राईज व्हिजिटमुळे विलंबाने येणाऱ्या कर्मचाऱ्यांची भंबेरी उडाली. सोमवारी सकाळी पावणे दहा वाजता महापौर दीपमाला काळे यांनी ठाण मांडून सर्वांची हजेरी घेत लेटलतीफ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई बडगा उगारण्याचा इशारा दिला आहे.**



गेल्या काही दिवसांपासून महापालिकेत अधिकारी आणि कर्मचारी वेळेवर येत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत होत्या. अधिकारी वेळेवर भेटत नाहीत, त्यामुळे आमची कामे रखडतात, असा सूर जळगावकर व्यक्त करत होते. या पार्श्वभूमीवर महापौरांनी आज थेट मैदानात उतरून महापालिकेच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांची कानउघाडणी केली. तसेच मंगळवारपासून सर्वांनी सकाळी पावणे दहा वाजता (९.४५) कार्यालयात हजर राहावे, अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, असा सज्जड इशारा महापौर दीपमाला काळे यांनी दिला. सोमवारी सकाळी ९.५० वाजता महापालिकेत अचानक भेट दिल्यानंतर लक्षात आले की, मनपा अधिकारी व कर्मचारी आपल्या सोईनुसार ड्यूटीवर येत आहेत. त्यांनी हे लक्षात घ्यावे की, आता प्रशासक काळ संपला आहे व कर्तव्याची जाणीव ठेवून आपण या शहरातील नागरिकांच्या कराच्या रकमेतून पगार घेतो. त्यांचे आपण देणे लागतो. या भावनेने कर्तव्य पालन केले पाहिजे,अशी समज महापौर दीपमाला काळे यांनी दिली.

**वेळेचे पालन करा; महापौरांचे निर्देश**

अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी सकाळी ९.४५ वाजेपर्यंत महापालिकेत हजर राहणे बंधनकारक आहे. वेळेवर हजेरी पत्रकावर सह्या करून प्रत्येकाने आपापल्या नेमून दिलेल्या विभागात कामावर रुजू व्हायचे आहे. सकाळी १० वाजेनंतर कार्यालयात येणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश महापौरांनी दिले आहेत. आपण नागरिकांना सेवा देण्यासाठी बांधील आहोत, त्यामुळे कर्तव्यात कसूर खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा महापौरांना दिला केले.

**आयकार्ड अनिवार्य**

गेल्या काही काळापासून महापालिकेत कर्मचारी वेळेवर येत नसल्याचे आणि कर्तव्यावर असताना ओळखपत्र (आयकार्ड) परिधान करत नसल्याचे समोर आले होते. या मोहिमेत महापौरांनी स्वतः प्रवेशद्वारावर थांबून प्रत्येक कर्मचाऱ्याची चौकशी केली. जे कर्मचारी विलंबाने आले आणि ज्यांच्याकडे आयकार्ड नव्हते, अशांची महापौरांनी जागेवरच कानउघडणी केली. जनतेच्या कामासाठी कर्मचारी वेळेवर उपस्थित असणे ही प्राथमिक गरज आहे, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

### ➤ महापौर ॲक्शन मोडवर

महापौर दीपमाला काळे यांनी लेटलतीफ कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांची हजेरी घेतल्याने महापौर ॲक्शन मोडवर आलेल्या आहेत. या निर्णयाचे जळगावकर नागरिकांकडून स्वागत होत आहे. महापालिकेच्या कामकाजात पारदर्शकता येईल आणि सामान्य जनतेची कामे विनाविलंब मार्गी लागतील,अशी आशा व्यक्त केली जात आहे.

### ➤ अधिकारीही आता रडारवर

सोमवारी सकाळी पावणे दहा वाजेच्या सुमारास महापौर स्वतः महापालिका कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी लेटलतीफ कर्मचाऱ्यांची झाडाझडती घेतली. तसेच हजेरीबाबत कडक नियम लागू करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने हजेरीबाबतचे अधिकृत पत्र (आदेश) काढण्याचे निर्देश दिले आहेत. शिस्तीचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे अधिकारीही आता रडारवर आले आहेत.

## थोडक्यात

### सात दिवसीय नि:शुल्क योग कार्यशाळेचे आयोजन

**जळगाव ।** जागतिक महिला दिनानिमित्त २ ते ८ मार्चदरम्यान महिलांसाठी सात दिवसीय नि:शुल्क ऑनलाईन योग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. महिलांचे समग्र आरोग्य : शारीरिक व मानसिक संतुलनासाठी योग या विषयावर आधारित ही विशेष कार्यशाळा रोज संध्याकाळी ५ वा. ऑनलाईन माध्यमातून घेण्यात येणार आहे. सर्व सहभागींना ई-प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. या कार्यशाळेत महिलांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. देवानंद सोनार यांनी केले आहे.

### डॉ. अमित राणे यांची जपानला फेलोशिपसाठी निवड



**जळगाव ।** पुण्यातील प्रसिद्ध रक्तवाहिन्या शल्य चिकित्सक डॉ. अमित राणे यांची जपानमधील टोकियो येथील प्रतिष्ठित जिकेई युनिव्हर्सिटी मध्ये डब्ल्युएफव्हीएस फेलोशिप प्रोग्रामसाठी निवड झाली आहे. जागतिक स्तरावरील या महत्त्वाच्या फेलोशिपसाठी निवड होणारे ते मोजक्या तज्ज्ञांपैकी एक ठरले आहेत. वर्ल्ड फेडरेशन ऑफ व्हॅस्क्युलर सोसायटीजच्यावतीने ही फेलोशिप प्रदान करण्यात आली आहे. जपानमधील प्रसिद्ध तज्ज्ञ प्रा. ओकी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. राणे हे रक्तवाहिन्यांशी संबंधित प्रगत शस्त्रक्रिया व उपचारांचे प्रशिक्षण घेणार आहेत. ३ ते ६ महिने चालणाऱ्या या फेलोशिपसाठी जिकेई युनिव्हर्सिटीच्या रक्तवाहिन्या शस्त्रक्रिया विभागातील डॉ. हिरोत्सुगु ओझावा यांनी त्यांना अधिकृत निमंत्रण धाडले आहे. या फेलोशिपमुळे डॉ. राणे यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील आधुनिक तंत्रज्ञान आणि संशोधनाचा अनुभव मिळणार आहे.

## संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त पालखी सोहळा उत्साहात



प्रतिनिधी । जळगाव

**संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त जळगाव शहर महानगरपालिकेच्या महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते शहरात विविध ठिकाणी महाराजांच्या पुतळ्याला व प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्वच्छता हाच खरा धर्म हा संदेश देणाऱ्या गाडगेबाबांच्या विचारांचा वारसा जपत प्रत्येक नागरिकाने जळगाव शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन महापौरांनी यावेळी केले.**

**मनपात प्रतिमेचे पूजन**

मनपा प्रशासकीय इमारतीत संत गाडगेबाबांच्या प्रतिमेला महापौर दीपमाला काळे यांनी माल्यार्पण केले. यावेळी उपमहापौर मनोज चौधरी यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

**महाराजांचा स्वच्छतेचा संदेश कृतीत आणण्याचे केले आवाहन**

**गाडगेबाबा उद्यानात पालखी सोहळा**

संत गाडगेबाबा उद्यानामध्ये महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केले. याप्रसंगी उपमहापौर मनोज चौधरी, माजी महापौर नितीन लढ्ढा, नगरसेवक दीपक सूर्यवंशी, प्रकाश बालाणी, विशाल भोळे, कल्पेश सोनवणे, नगरसेवक आशा पाटील, वैशाली पाटील, माधुरी अतुल बारी, जयश्री राहुल पाटील, निलेश तायडे यांचेसह माजी नगरसेवक विशाल त्रिपाठी, महेश चौधरी, राजू मराठे, राहुल वाघ, अतुल बारी, राहुल पाटील, महेश पाटील, अरुण शिरसाळे आदी उपस्थित होते.

## कोदोली येथे श्रीमद् भागवत कथा सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । जामनेर

तालुक्यातील कोदोली येथे आयोजित श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम संकीर्तन सोहळा भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडला. ग्रामस्थांच्या पुढाकारातून आणि समर्थ ग्रामस्थ मंडळाच्या सहकार्याने हा धार्मिक सोहळा संपन्न झाला. आठवडाभर चाललेल्या या कार्यक्रमात विविध कीर्तनकार, प्रवचनकार व भजन मंडळींनी सहभाग घेतला होता.

## वाहतुकीची कोंडी...



**जळगाव -** शहरातील कानळदा रोडवरील १०० फुटी मारोती चौकात ढाप्याचे काम सुरु असल्याने वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

## सामुदायिक रेडिओचे कार्य जाणून घेण्यासाठी १०५ विद्यार्थ्यांची मनभावनला भेट

### • रेडिओ केंद्रातील प्रत्यक्ष कार्यपद्धती अन् रोजगाराच्या संधींचे मिळाले मार्गदर्शन

प्रतिनिधी । जळगाव

**केसीई सोसायटी संचलित मूळजी जेठा (स्वायत्त) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नुकतीच रेडिओ मनभावन ९०.८ एफ.एम. या सामुदायिक रेडिओ केंद्राला सदिच्छा भेट दिली. रेडिओ जॉकी हा विषय अभ्यासक्रमात निवडलेल्या १०५ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन रेडिओ प्रसारणाचे प्रत्यक्ष अनुभव घेतले.**




या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी ध्वनीमुद्रण कक्षाची रचना, अत्याधुनिक तांत्रिक उपकरणांची हाताळणी आणि प्रत्यक्ष ध्वनीमुद्रण प्रक्रिया जवळून अनुभवली. सामुदायिक रेडिओचे दैनंदिन कामकाज कसे चालते, लोकहितकारी कार्यक्रमांची आखणी, संहिता लेखन आणि प्रत्यक्ष प्रसारण याविषयीच्या तांत्रिक बाबी विद्यार्थ्यांनी जाणून घेतल्या. याप्रसंगी रेडिओ मनभावनचे संचालक अमोल देशमुख यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.याप्रसंगी प्रा.गोपीचंद धनगर, प्रा.वर्षा उपाध्ये, संदीप केदार, साहिल, शुभम आणि रेडिओ मनभावनमधील सहकारी उपस्थित होते.

## गाडगेबाबांनी केवळ गावांची नव्हे तर 'समाजमनाचीही केली स्वच्छता'

### नगराध्यक्षा लीला चौधरी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । धरणगाव

**संत गाडगेबाबा यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त धरणगाव नगरपालिकेच्या सभागृहात अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी त्यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करून कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले.**

या कार्यक्रमात बोलताना नगराध्यक्षा लीला सुरेश चौधरी यांनी संत गाडगेबाबांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या कार्याची महती सांगितली. त्या म्हणाल्या, 'गाडगेबाबांनी केवळ गावांची स्वच्छता केली नाही, तर समाज मनातील अंधश्रद्धा, अस्वच्छता आणि अन्यायाची घाण दूर करण्याचे महान कार्य केले. स्वतः अल्पशिक्षित असूनही त्यांनी शिक्षणाचे महत्त्व समाजाला पटवून दिले आणि गोरगरीबांच्या उन्नतीसाठी आयुष्य झिजवले'. गाडगेबाबांनी अध्यात्माच्या माध्यमातून समाजप्रबोधन करत स्वच्छता, सामाजिक न्याय आणि समता या मूल्यांचा प्रचार-प्रसार केला. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी जनजागृती करत समाजसुधारणेचा प्रभावी संदेश दिला. साधी व गरीब राहणी स्वीकारून त्यांनी त्यागमय जीवन जगले. विसाव्या शतकातील समाजसुधारक चळवळीत त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचेही नगराध्यक्षा चौधरी यांनी नमूद केले.

यावेळी पालिकेचे कार्यालयीन अधीक्षक भिकन पवार, आरोग्य निरीक्षक संतोष बिऱ्हाडे, गटनेते निलेश चौधरी, नगरसेवक भागवत चौधरी, हाजी इब्राहिम, लक्ष्मण माळी, परमेश्वर महाजन, सुनील चौधरी, नगरसेविका प्रमिला शिरसाठ, ज्योती पाटील, हेमांगी अग्निहोत्री तसेच विविध पदाधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्रिप्टो करन्सी ट्रेडिंग नावाने ऑनलाईन फसवले डॉ. अनिल शिंदेंना १ कोटी ६५ लाखांत गंडवले

प्रतिनिधी । अमळनेर

**क्रिप्टो करन्सी ट्रेडिंगसाठी सोलनोय नावाचे ॲप डाउनलोड करण्याचे सांगून बँक खात्यावर गुंतवणूक करायला लावून एका महिलेसह साथीदारांनी अमळनेरच्या नामवंत सर्जन तथा भाजपचे पदाधिकारी डॉ. अनिल शिंदे यांना एक कोटी ६५ लाख ५७ हजार २०४ रुपयात फसवल्याची घटना घडली.**

डॉ अनिल शिंदे यांनी सायबर क्राईमला फिर्याद दिली की,२१ जानेवारी ते १९ फेब्रुवारीदरम्यान झासी प्रवीण पाटील नावाच्या महिलेने तिच्या साथीदारांसह तिच्या विविध क्रमांकावरून त्यांच्याशी संपर्क केला. त्यानंतर विश्वास संपादन करून ट्रेडिंग मार्केटिंगमध्ये पैसे गुंतवण्याचा आग्रह धरून अधिकचे पैसे देण्याचे आमिष दिले. त्यानंतर सोलनोय कॉन्ट्रॅक्ट डॉट कॉम अशी लिंक पाठवून सोलनोय ॲप डाउनलोड करायला सांगितले. सुरुवातीला ७० हजार रुपये गुंतवण्यास सांगितले. त्याबदल्यात डॉ.शिंदे यांना १ लाख ५३ हजार २१ रुपये नफा दिला. यात डॉ. शिंदे यांना विश्वास निर्माण झाला. त्यानंतर त्यांनी वेळोवेळी झासी पाटील व तिच्या साथीदारांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या खात्यावर १ कोटी ६५ लाख ५७ हजार २०४ रुपये ऑनलाईन त्यांना दिले. मात्र झासी पाटील व साथीदारांनी कोणतीही परतावा रक्कम परत दिली नाही.

## स्वच्छतेचा संदेश देत परिसर स्वच्छ अन् सुंदर ठेवण्याचा केला संकल्प

### संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त ज्येष्ठ नागरिक संघाचे ग्राम स्वच्छता अभियान; गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन

प्रतिनिधी । चोपडा

**संत गाडगेबाबा जयंतीचे औचित्य साधून चोपडा ज्येष्ठ नागरिक संघाच्य वतीने दि.२३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता ग्राम स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले.**



कार्यक्रमाच्या प्रारंभी संघाचे अध्यक्ष जयदेव देशमुख यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी स्वचछतेचा संदेश देत परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संकल्प करण्यात आला. या उपक्रमात माजी अध्यक्ष विजय करोडपती, उपाध्यक्ष जिजाबराव नेरपगारे, दिलीपराव नाना पाटील, माजी सचिव प्रमोद डोंगरे, सचिव विलास पाटील तसेच ज्येष्ठ सदस्य गोविंदा महाजन, राजेंद्र साळुंखे, गोकुळ पाटील, परशुराम पेंढारकर, प्रा. सुधाकर पाटील यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. ज्येष्ठ नागरिकांनी स्वतः झाडू हाती घेत परिसराची स्वच्छता करत समाजापुढे आदर्श ठेवला. वयोमानाची पर्वा न करता त्यांनी दाखविलेली सामाजिक बांधिलकी पाहून नागरिकांनी कौतुक व्यक्त केले. ज्येष्ठांचा हा उपक्रम समाजप्रबोधनाचा प्रेरणादायी संदेश देणारा ठरला.



## 'मन की बात' कार्यक्रमाला नगरसेवकांची उपस्थिती

प्रतिनिधी । जळगाव

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात या लोकप्रिय दृकश्राव्य कार्यक्रमाचे जळगाव शहरात विशेष आयोजन करण्यात आले होते. धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संस्था आणि आ. राजूमामा भोळे यांच्या पुढाकाराने रविवारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

शहरातील सर्व नगरसेवकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, आ.राजूमामा भोळे, महापौर दीपमाला काळे, भाजप गटनेता प्रकाश बालाणी, शिवसेना जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, माजी खा. डॉ.उल्हास पाटील, माजी आ. शिरीष चौधरी, नशिराबादचे नगराध्यक्ष योगेश पाटील, फैजपूरचे नगराध्यक्ष दामिनी सराफ यांच्यासह कार्यक्रमाला राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे जळगाव महानगरपालिकेतील भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना या दोन्ही पक्षांच्या सर्व नगरसेवकांनी एकत्र येत पंतप्रधानांचे संबोधन ऐकले. विकासकामे, आर्टिफिशियल इंटेलिजंटचे तंत्रज्ञान तसेच युवक कल्याण, क्रीडा क्षेत्राचा विकास आणि जनसंवादाच्या दृष्टीने मन की बातमधील मुद्दे लोकप्रतिनिधींसाठी मार्गदर्शक ठरतात, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# काँग्रेसचे माजी आ. शिरीष चौधरी भाजपच्या वाटेवर?

## पंतप्रधान मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमास उपस्थिती दिल्याने तर्क-वितर्कांना उधाण!

प्रतिनिधी । जळगाव

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाच्या निमित्ताने जळगाव शहरात आयोजित एका कार्यक्रमात काँग्रेसचे रावेरमधील माजी आमदार शिरीष चौधरी यांची उपस्थिती राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. विशेष म्हणजे यावेळी केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे या देखील उपस्थित होत्या.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात'चे थेट प्रक्षेपण जळगावात आयोजित करण्यात आल होते. यावेळी महापौर दीपमाला काळे, माजी खासदार उल्हास पाटील, भाजपचे जळगाव महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पंतप्रधान मोदी यांनी देशातील सामाजिक उपक्रम, युवकांचा सहभाग, महिला सक्षमीकरण आणि स्वच्छता अभियान यांसारख्या विषयांवर भाष्य केले. कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवरांमध्ये अनौपचारिक संवाद रंगला. मात्र, काँग्रेसचे निष्ठावान माजी आमदार शिरीष चौधरी यांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. स्थानिक राजकारणात सक्रिय भूमिका बजावणारे चौधरी भाजपच्या कार्यक्रमात सहभागी झाल्याने राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

### ● रक्षा खडसे यांच्या पोस्टनंतर चर्चांना वेग

काही राजकीय निरीक्षकांच्या मते, लोकशाही व्यवस्थेत पंतप्रधानांचा 'मन की बात' कार्यक्रम हा पक्षीय मर्यादेपलीकडील असल्याने विविध पक्षांचे नेते उपस्थित राहणे स्वाभाविक आहे. तर दुसरीकडे, माजी आमदार चौधरी यांच्या उपस्थितीमागे संभाव्य राजकीय हालचालींचे संकेत असल्याचीही चर्चा रंगू लागली आहे. या कार्यक्रमाची छायाचित्रासह माहिती खुद्द केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी आपल्या अधिकृत समाज माध्यम खात्यावर दिली आहे.

# अमळनेर तालुक्यातील ६७ ग्रामपंचायतींवर सरपंच राहणार प्रशासक

प्रतिनिधी । अमळनेर

राज्यातील २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत संपत असलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेणे शक्य नसल्याने शासनाने त्या ग्रामपंचायतींवर सरपंचानाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांची प्रशासकीय समिती नेमण्याचेही आदेशात अधिसूचनेत नमूद आहे. त्यामुळे सहा महिने निवडणूक होत नाही. तोपर्यंत विद्यमान कार्यकरिणीच कारभार पाहणार आहे.

अमळनेर तालुक्यात ११९ ग्रामपंचायती आहेत. त्यातील आंचलवाडी, आर्डी, आटाळे, बोदर्डे, बोहरा, धानोरा , दापोरी बुद्रुक , धावडे ,ढेकू खुर्द , देवगाव ,चौबारी ,एकलहरे , एकतास ,फापोरे बुद्रुक , एकरुखी, गांधली, गडखांब, गलवाडे खुर्द, गलवाडे बुद्रुक, हिंगोणे खुर्द प्र अ ,हिंगोणे खुर्द प्र ज , जवखेडा ,जुनोने , जळोद , करणखेडे ,कळमबे, कलाली, कावपिंप्री, कळमसरे, कंडारी, कुऱ्हे बुद्रुक , खेडी प्र ज, खवशी खेडी प्रअ, लोण खुर्द, लोण चारम, मेहेरगाव, म्हसले मांडळ, मुडी प्र अ, निंभोरा, नांद्री, निम, पिळोदे,पातोंडा, पाडसे,पळासदळे , प्र डांगरी, पिंगळवाडे, पिंपळे बुद्रुक, पिंपळी प्र ज, पाडळसरे, रामेश्वर बुद्रुक ,रामेश्वर खुर्द , सारबेटे बुद्रुक ,सारबेटे खुर्द ,सावखेडा , सबगव्हाण ,सोनखेडी, सात्री , शिरूड , शहापूर , तांदळी , टाकरखेडे ,वासरे ,वाघोदे , झाडी आदी ६७ ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्यात येणार आहे.

शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या सह सचिव वर्षा भरोसे यांनी ग्रामपंचायत अधिनियम १८२ (१) प्रमाणे कलम १५१ प्रमाणे प्रशासक नेमण्याचे अधिकार जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहेत. त्यामुळे पुन्हा विद्यमान कार्यकरिणीला एकप्रकारे ग्रामपंचायत कारभार पाहण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत.

## थोडक्यात

### साखरपुड्यासाठी गेले अन् विवाह करून परतले!

**पाचोरा ।** तालुक्यातील गोराडखेडा येथील अनवर नईम खान यांचा साखरपुडा बुधवारी आव्हाने (ता. जळगाव) येथील फिजाबी अकील शेख यांच्याशी होणार होता. साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी सर्व मंडळी उपस्थित होती. लग्नाची तारीख ठरवताना, मुलीच्या वडिलांनी हुंड्याची रक्कम आणि इतर खर्चाची जुळवाजुळव करण्यासाठी दोन महिन्यांचा वेळ मागितला. हे पाहून उपस्थित असलेले प्रतिष्ठित नागरिक शेख अलीम यांनी कर्जाचा डोंगर न चढवता निकाह व्हायला हवा. त्यामुळे साखरपुड्यासाठी गेलेली मंडळी निकाह लावून घरी परतली.

### कीर्तनाच्या माध्यमातून शिवजयंती साजरी

**भुसावळ ।** तालुक्यातील सुनसगाव येथे सालाबादप्रमाणे यंदाही किर्तनाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. येथे गेल्या पाच वर्षांपासून कोणत्याही प्रकारची मिरवणूक न काढता किर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकून तरुणांमध्ये जनजागृती करण्यात आली.

# गरताडमध्ये विवाह सोहळ्यातून सेवाभावाचा संदेश

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील गरताड येथे दि.२२ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या विवाह सोहळ्यात सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी आदर्श पाहायला मिळाला.**



सामाजिक कार्यकर्ते शशिकांत नारायण पाटील यांचे सुपुत्र चि.अक्षय व चि.आशिष यांच्या विवाहानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांनी प्रेरित सेवाभावी संस्थांना ५१ हजार रुपयांचा मंगलनिधी प्रदान करण्यात आला. नवपरिणीत चि.अक्षय हा कॅनडामध्ये व्यवसाय करीत असून चि.आशिष देखील उच्चशिक्षित आहे. दोघेही बालपणापासून राष्ट्रीय

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्थांना ५१ हजारांचा मंगलनिधी प्रदान

स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असल्याने संघविचारांना चालना मिळावी, या हेतूने त्यांनी विवाह सोहळ्यात सामाजिक योगदान देण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या आग्रहास्तव वडील शशिकांत पाटील यांनी ५१ हजार रुपयांचा धनादेश जिल्हा संघचालक डॉ. मनोज साळुंखे यांच्याकडे सुपूर्द केला. हा धनादेश वरांचे आजोबा नारायण तंगा पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी विभाग संघचालक राजेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, ॲड.दुर्गादास पाटील, प्रा.एच. ए.पाटील यांच्यासह विविध राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व आप्तेष्ट उपस्थित होते.

# संयुक्त जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी

प्रतिनिधी । भुसावळ

तालुक्यातील निंभोरा बुद्ध विहारात नागरिकांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या संयुक्त जयंती उत्सवासाठी समितीची नवीन कार्यकारिणी एकमताने निवडण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी प्रकाश सरदार यांची निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्ष तरुण गवई आणि सुरज पवार, सचिव दीपक सुरवाडे व आशिष सुरवाडे, सहसचिव राहुल तायडे, कोषाध्यक्ष अजय वाघ, सहकोषाध्यक्ष प्रणव मेघप्रम, संघटक अरुण भालेराव, सहसंघटक उल्हास मोरे, प्रसिद्धी प्रमुख रमेश खंडारे, यांची निवड करण्यात आली. तर सदस्यपदी विशाल जोहरे, मिलिंद गाडे, सागर नाईक, आनंद सुरडकर, गौरव नरवाडे, सुमेध कांबळे, सुरेश बोडखे, मधुकर चव्हाण, यश अवचार आर्दीची निवड केली.

# पी. आर. हायस्कूलमध्ये संत गाडगे महाराज जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील पंचायत समिती शिक्षण विभाग व पी. आर. हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने संत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन गटशिक्षणाधिकारी डॉ.भावना भोसले व शिक्षण विस्तार अधिकारी राजेंद्र सैंदाने यांच्या हस्ते करण्यात आले.**



यावेळी डॉ.भावना भोसले यांनी संत गाडगे बाबांच्या समाजप्रबोधन कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाज जागृती यांसारख्या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. 'संत गाडगे महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य केल्यास आरोग्यदायी व सुसंस्कृत जीवन जगणे अधिक सुलभ होते. सामाजिक जीवनात वावरताना गाडगे बाबांचे विचार व आचार आत्मसात करणे अत्यावश्यक आहे', असे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक डी. एस. पाटील, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या उपप्राचार्या रत्नमाला चौधरी, पर्यवेक्षक प्रा. सुरेश अत्तरदे, तसेच नीरज शिंदे, जितेंद्र बोरसे, विजय दाभाडे यांच्यासह शिक्षकवृंद व पंचायत समिती शिक्षण विभागाचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मिलिंद हिंगोणेकर, योगेश नाईक व जितेंद्र दाभाडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# धरणगाव तालुक्यात दहावीच्या परीक्षांना शांततेत प्रारंभ

## ८ केंद्रांवर सीसीटीव्ही निगराणी; कॉपीमुक्त वातावरणाबाबत प्रशासनाचा दावा

प्रतिनिधी । धरणगाव,

**तालुक्यात दहावीच्या परीक्षांना शांततेत व सुरळीत प्रारंभ झाला असून प्रशासनाच्या काटेकोर नियोजनामुळे सर्व परीक्षा केंद्रांवर कॉपीमुक्त वातावरण असल्याचा दावा करण्यात आला आहे. पहिल्याच दिवशी आठही केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली परीक्षा प्रक्रिया पार पडली.**

तालुक्यात पी. आर. हायस्कूल, इंदिरा गांधी विद्यालय, सारजाई कुडे विद्यालय, निळकंठेश्वर हायस्कूल (चावलखेडा), मा. ना. काबरे विद्यालय (सोनवद), न्यू इंग्लिश स्कूल (नांदेड), स. न. झवर विद्यालय (पाळधी) आणि माध्यमिक विद्यालय (पाळधी) अशी एकूण आठ परीक्षा केंद्रे कार्यरत आहेत. प्रत्येक केंद्रावर स्वतंत्र नियंत्रण कक्ष व कस्टडी व्यवस्थेची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

परीक्षेपूर्वी शिक्षण विभागाने झूम मीटिंगद्वारे केंद्रप्रमुख, पर्यवेक्षक व संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधला. गटशिक्षणाधिकारी डॉ. भावना भोसले यांनी सांगितले की, सीसीटीव्ही निगराणीमुळे कॉपीमुक्त अभियानाला बळ मिळाले आहे. दिवसभर सर्व केंद्रांवर लक्ष ठेवले जात असून अद्याप कोणत्याही ठिकाणी गैरप्रकार आढळलेला नाही.

पंचायत समिती शिक्षण विभागाने सर्व केंद्रांवर बैठे पथके तैनात केली आहेत. तसेच गटविकास अधिकारी व तहसीलदार यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागाची भरारी पथके सक्रिय आहेत. धरणगाव पोलीस निरीक्षक सुनील पवार व सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

दरम्यान, काही ठिकाणी कॉपी सुरू असल्याच्या अफवा पसरवल्या जात असल्याच्या चर्चा असल्या तरी प्रशासनाने त्या फेटाळल्या आहेत. विद्यार्थ्यांनी व पालकांनी अफवांकडे दुर्लक्ष करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शिक्षण विभाग, महसूल प्रशासन व पोलीस यंत्रणेच्या समन्वयामुळे तालुक्यात परीक्षांना पारदर्शक व शांततेत प्रारंभ झाल्याचे चित्र आहे.

# प्रताप महाविद्यालयात अनधिकृत प्रवेश; तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील प्रताप महाविद्यालयच्या आवारात अनधिकृतपणे प्रवेश करून विद्यार्थिनींशी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाविरुद्ध अमळनेर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे महाविद्यालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.**

साहिल पठाण नामक तरुणाने महाविद्यालयाच्या कार्यालयाबाहेर गोंधळ घातल्याने विद्यार्थ्यांमध्ये वाद निर्माण झाला. गोंधळाचा आवाज ऐकून प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव यांच्यासह प्राध्यापकांनी तात्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. संबंधित तरुण हा महाविद्यालयाचा विद्यार्थी नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, एस.वाय.बी.एस्सी.च्या एका विद्यार्थिनीने प्राचार्यांकडे लेखी तक्रार दिल्यानंतर अमळनेर पोलीस ठाण्यात साहिल पठाण याच्याविरुद्ध कलम ३२९ (३) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघातर्फे संत गाडगे महाराज जयंती साजरी

प्रतिनिधी । जळगाव

**थोर समाजसुधारक, स्वच्छता आणि सेवाभावाचे प्रणेते राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघातर्फे त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात गाडगे महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून त्यांच्या सामाजिक कार्याचे स्मरण करण्यात आले.**

समाजातील अंधश्रद्धा, अस्वच्छता व सामाजिक विषमता दूर करण्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या राष्ट्रसंत गाडगे महाराजांनी आपल्या कृतीतून समाजप्रबोधनाचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याच्या उद्देशाने



गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संघटनेच्या कार्यालयात गाडगे महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष नरेंद्र कदम यांनी, राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या सेवाभावी आणि समाजजागृतीच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. स्वच्छता, शिक्षण आणि माणुसकीचा संदेश देणारे गाडगे महाराजांचे विचार आजच्या काळात अधिकच प्रेरणादायी आहेत, असे त्यांनी सांगितले. संस्थापक महासचिव भगवान सोनार यांनी, गाडगे महाराजांच्या सामाजिक चळवळीची माहिती देत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. केंद्रीय कार्याध्यक्ष सागर ओतारी यांनी आपल्या मनोगतात, संत गाडगे महाराजांनी समाजातील सर्व घटकांसाठी काम केले. त्याच प्रमाणे पत्रकारांनी देखील काम करावे, असे आवाहन केले. या प्रसंगी संघटनेचे संस्थापक खजिनदार ललित खरे, उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष दीपक कुलकर्णी, जिल्हा कार्याध्यक्ष हेमंत पाटील, जळगाव तालुका सचिव योगेश सुने, जळगाव शहर उपाध्यक्ष निखिल मोरे, शहर सचिव योगेश चौधरी, लालचंद अहिरे, विकास चव्हाण, मनोज जोगी, किशोर शिंपी, संतोष माळी आदी पदाधिकारी व पत्रकार उपस्थित होते. यावेळी समाजसेवा, स्वच्छता, सामाजिक सलोखा आणि जनसामान्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प पत्रकारांनी केला.

# गावाचा विकास सरपंचाच्या मानसिकतेवर अवलंबून : ना.रक्षा खडसे

## जळगावमध्ये 'सरपंच संवाद' कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । जळगाव

**गावाचा सर्वांगीण विकास हा केवळ आमदार किंवा खासदारांवर अवलंबून नसून तो मुख्यतः सरपंचाच्या नेतृत्व गुणांवर आणि विकासाबाबतच्या बांधिलकीवर अवलंबून असतो, असे प्रतिपादन केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले.**



जिल्हा परिषदेच्या शाहू महाराज सभागृहात सोमवारी क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या वतीने आयोजित ञ्सरपंच संवादफकार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे तसेच क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया चे हिमांशू पटेल आदी अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी बोलताना रक्षा खडसे म्हणाल्या की, ग्रामसभेत गावाच्या विकासाचे अचूक नियोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

शासनाचा संपूर्ण पाठिंबा सरपंचांच्या पाठीशी असून, सरपंच हा विकासाचा कणा व केंद्रबिंदू आहे. अशा संवाद कार्यक्रमांमुळे सरपंच अधिक सक्षम होतील आणि विकास प्रक्रियेला गती मिळेल. ग्रामपंचायतीचा सर्व डेटा सरपंचांकडे उपलब्ध असल्यास विकासकामांत कोणतीही अडचण येत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी सरपंच ते केंद्रीय मंत्री असा स्वतःचा प्रवासही उपस्थितांसमोर मांडला. जिल्ह्यातील सर्व सरपंचांसाठी आयोजित या दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत ट्रेनर कविता वारे, सविता पांडे, विशाल चौधरी आणि सतीश उगले हे सरपंच व विस्तार अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाला जिल्ह्यातील सरपंचांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

# कुसुंबेच्या सुपुत्रांचा समर्पण सोहळा; भक्तीमार्गाची अभिमानास्पद वाटचाल

प्रतिनिधी । चोपडा



**येथून जवळच असलेल्या कुसुंबे गावातील चि.पू. कनकभाई राजेंद्र पाटील यांचा 'समर्पण सोहळा' भक्तीमय वातावरणात संपन्न होत आहे.**

संस्थेच्या माध्यमातून मानवसेवेसाठी स्वतःला अर्पण करण्याचा त्यांचा निर्णय परिसरासाठी अभिमानाचा विषय ठरत आहे. उच्च शिक्षण घेतल्यानंतर संसाराच्या मोहाला न जुमानता ईश्वरी सेवेचा मार्ग स्वीकारण्याचा त्यांचा निर्धार अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. 'उच्च शिक्षण, उज्ज्वल ध्येय आणि सोबत भक्तीची ओढ' या भावनेतून त्यांनी घेतलेला हा निर्णय गावासाठी गौरवाची बाब मानली जात आहे. एकीकडे कलियुगाचा प्रभाव वाढत असताना आपल्या एकुलत्या एक सुपुत्राला समर्पणासाठी तयार करणे ही राजेंद्रभाई पाटील व त्यांच्या परिवाराची मोठी गुरुदक्षिणा असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

कनकभाई यांच्या या निर्णयामुळे कुसुंबे गावाचे नाव भक्तीच्या नकाशावर सुवर्णाक्षरांनी कोरले जाईल, असा विश्वास व्यक्त होत आहे. गावातील तरुणांसाठी कनकभाई आदर्श उदाहरण ठरणार आहेत.